महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN: U40109MH2005SGC153645

दूरध्वनीक्र.२६४७२१३१/२६४७४२११
फॅकसनं.:०२२-२६५८१०८३
Email:ciro@mahadiscom.in
Websitee :www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी-९,प्रकाशगड,४था मजला,
प्रा.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे(पूर्व),मुंबई-५१.

---

जा.क्र.:औसंवि/ब/ १५७२५ दिनांक: २८.०९.२०२०

# परिपत्रक

**विषय:-** कर्मचाऱ्याला कोव्हीड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव झाल्यानंतर वैद्यकीय उपचाराकरीता तातडीची विशेष वैद्यकीय अग्रीम रक्कम मंजूर करणेबाबत.

******

राज्यामध्ये कोरोना कोव्हीड-१९ विषाणूचा मोठया प्रमाणात प्रादुर्भाव वाढलेला असून, सद्यस्थितीत कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाकरीता शासन निर्णयानुसार कार्यालयात उपस्थित रहाणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. कोव्हीड-१९ विषाणू हा संसर्गजन्य रोग असून, कर्मचाऱ्याला कंपनीचे काम करताना, सदर आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कंपनीतील कर्मचाऱ्यांना कोव्हीड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झाल्याची बहुसंख्य प्रकरणे सांधिक कार्यालयाच्या निदर्शनास आलेली आहेत.

२. कर्मचाऱ्याला कोरोना (कोव्हीड-१९) ची लागण झाल्यानंतर तातडीने वैद्यकीय उपचारासाठी कंपनीच्या अथवा मेडीक्लेम योजनेतंर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयांत बेड उपलब्ध होत नाही. पर्यायाने तातडीची बाब म्हणून इतर रुग्णालयांत (मान्यताप्राप्त यादीत नसलेल्या रुग्णालयांत) बेड उपलब्ध आहे अशा ठिकाणी वैद्यकीय उपचार घेण्यासाठी काही प्रमाणात अग्रीम रक्कम रोख स्वरुपात जमा करावी लागते. अशा परिस्थितीमध्ये कर्मचाऱ्याकडे पुरेशी रक्कम नसल्याकारणाने वैद्यकीय उपचारासाठी विलंब होऊ नये, याकरीता अशा कर्मचाऱ्यांना तातडीची विशेष अग्रीम रक्कम (कोव्हीड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव झाल्यामुळे) रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार मात्र) पर्यत देण्याची बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

३. याबाबत मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) व संचालक (मासं) यांच्याशी विचारविनिमय करुन, कंपनीतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना कोरोना (कोव्हीड-१९) ची लागण झाल्यास अशा कर्मचाऱ्यांना **तातडीची विशेष अग्रीम रक्कम रु. ५०,०००/- (रु. पन्नास हजार) पर्यत देण्याबाबत मंजूरी दिली आहे.** सदर तातडीची विशेष अग्रीम रक्कम सर्व सहाय्यक प्रवर्गाच्या व प्रशिक्षणार्थी अभियंता या कर्मचाऱ्यांना देखील लागू राहील.

४. ज्या कर्मचाऱ्याला कोव्हीड-१९ आजाराची बाधा / लागण झाली आहे व त्यास रुग्णालयात दाखल केले असेल तरच खालील अटी व शर्तीच्या आधारे एक विशेष बाब म्हणून उपरोक्त अग्रीम रक्कम देण्यात येईल.

- कर्मचाऱ्याला कोव्हीड-१९ या आजाराची बाधा / लागण झाल्याबाबतचा पॉझिटिव्ह (Positive) तपासणी अहवाल व रुग्णालयाचे वैद्यकीय उपचाराकरीताचे अंदाजपत्रक अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.
- कोव्हीड-१९ आजारावर कर्मचाऱ्याला तातडीने उपचार करता यावेत, याकरीता एक विशेष बाब म्हणून वैद्यकीय अग्रीम रक्कम रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार मात्र) मंजूर करण्याचे अधिकार प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७७, दि. ०४.०१.२०१४ नुसार राहतील.
- सदर विशेष अग्रीम रक्कम ही कोव्हीड-१९ या आजाराकरीता रुग्णालयात दाखल होऊन उपचार घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना /सहाय्यक/ प्रशिक्षणार्थी अभियंते या प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांनाच लागू राहील.
- सदर विशेष अग्रीम रकमेची वेतनातून वसुली कर्मचारी कामावर रुजू झाल्यावर समान १० हफ्त्यामध्ये करावी.

- सर्व सहाय्यक / प्रशिक्षणार्थी अभियंते प्रवर्गाच्या कर्मचाऱ्यांची अग्रीम वसूली समान २० हफ्त्यामध्ये करण्यात यावी.
- कर्मचारी /सहाय्यक / प्रशिक्षणार्थी अभियंते या प्रवर्गाच्या विशेष अग्रीम प्रकरणी त्यांची रजा मंजूर करणारे अधिकारी हे अग्रीम रकमेसाठी संबंधीतांचा कोव्हीड-१९ बाबतचा Positive Report व संबंधीत कर्मचारी रुग्णालयात दाखल झाल्याची खात्री करुन विशेष अग्रीम रकमेस शिफारस करेल व सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजूरीनंतर त्वरीत सदर रक्कम कर्मचारी /सहाय्यक प्रवर्ग / प्रशिक्षणार्थी अभियंता यांना अदा करतील.

  कर्मचाऱ्यांना कोव्हीड-१९ आजाराशी संबंधीत विशेष अग्रीम रक्कम मिळण्यासाठीचा अर्ज व त्यासंबंधीची कागदपत्रे Online Employee Portal द्वारे भरण्याबाबतची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरु असून, सदर सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- सदर **कोव्हीड-१९ - विशेष अग्रीम रक्कम** हे परिपत्रक प्रसारित झाल्याच्या तारखेपासून पुढील प्रकरणाकरीता लागू राहील.

सदर परिपत्रक Employee Portal / E-Library-Industrial Relations Department येथे उपलब्ध आहे.

(संजय रा. ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी